# मनुस्मृती हा जगातील पहिला संविधान ग्रंथ - शरद पोंक्षे

## स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या विचारधारेवर व्याख्यान; गांधी, नेहरूंच्या धोरणांवरही टीका

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**नागपूर :** युरोपातील देशांमध्ये लोक रानटी अवस्थेत वावरत होते. त्यांना कपडे कसे घालायचे याचीही अक्कल नव्हती. तेव्हा माझ्या पूर्वजांनी जगातील पहिला संविधान ग्रंथ लिहिला, तो म्हणजे मनुस्मृती, असे प्रतिपादन अभिनेते शरद पोंक्षे यांनी गुरुवारी नागपूर येथे केले. भारतीय प्राचीन ग्रंथसंपदा, संस्कृत भाषा आणि सांस्कृतिक वारसा यांचे महत्त्व विशद करताना त्यांनी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या विचारांचा दाखला दिला. यावेळी त्यांनी भाजप सरकार, महात्मा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या धोरणांवरही त्यांनी टीका केली.

राणी लक्ष्मी दुर्गोत्सव मंडळाच्यावतीने स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या विचारधारेवर आयोजित व्याख्यानात पोंक्षे बोलत होते. भारतीय ज्ञानपरंपरेपासून नवी पिढी दूर गेल्याची खंत व्यक्त करत त्यांनी संस्कृत, वेद, उपनिषदे, पुराणे आणि महाभारत यांसारख्या प्राचीन ग्रंथांच्या अभ्यासावर भर दिला.

देवनागरी ही वैज्ञानिक लिपी असून, जसे बोलले जाते तसे लिहिले जाते, हे तिचे वैशिष्ट्य आहे. गेल्या अडीचशे वर्षांत इंग्रजीचे महत्त्व वाढल्यामुळे भारतीय भाषांकडे दुर्लक्ष झाले. इंग्रजीच्या प्रभावामुळे संस्कृत आणि प्राचीन भारतीय ग्रंथांमधील ज्ञानापासून अनेक पिढ्या दूर राहिल्या. ऋग्वेद हा पहिला छापील ग्रंथ होता, असा दावा त्यांनी केला. संस्कृत भाषेचे ज्ञान नसल्यामुळे प्राचीन ग्रंथांमधील विचार आणि त्यांचे महत्त्व अनेकांना समजत नाही. पृथ्वीचे गोलाकार स्वरूप आणि विविध ज्ञानविषयक संकल्पनांचा उल्लेख प्राचीन भारतीय ग्रंथांमध्ये आढळतो, असे सांगत त्यांनी भारतीय ज्ञानपरंपरेचे महत्त्व विशद केले.

भाजप सरकारच्या अनेक गोष्टी आपल्याला पटत नसल्याचे सांगतानाच, हिंदू संस्कृती टिकवायची असेल आणि आपल्या मुलींना बुरख्यात बघायचे नसेल, तर आपल्याला भाजपचेच सरकार हवे, अशी राजकीय भूमिकाही पोंक्षे यांनी मांडली. भाषा आणि संस्कृती यांचा जवळचा संबंध असून, भाषा संपली तर संस्कृतीचे अस्तित्वही धोक्यात येते. मातृभाषेचा वापर वाढवणे, भारतीय भाषांमधील साहित्याचे वाचन करणे आणि प्राचीन ग्रंथांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. सावरकरांनी भाषाशुद्धीचा पुरस्कार केला होता. भाषेच्या माध्यमातून सांस्कृतिक अस्मिता जपण्यावर त्यांनी भर दिला, असेही पोंक्षे यांनी सांगितले.



### गांधींमुळे भारतात मुस्लीम राहिले

स्वातंत्र्यानंतर भारताच्या शिक्षणव्यवस्थेची दिशा ठरवण्याचा अधिकार मुस्लीम केंद्रीय शिक्षणमंत्र्यांना देण्यात आला, अशी टीका पोंक्षे यांनी केली. स्वातंत्र्यानंतर पहिले पाच केंद्रीय शिक्षणमंत्री मुस्लीम होते, असे सांगत त्यांनी महात्मा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या धोरणांवरही टीका केली. मुस्लिमांसाठी स्वतंत्र देश निर्माण झाल्यानंतरही महात्मा गांधी यांच्यामुळे भारतात आठ टक्के मुस्लीम राहिले. आयुष्यभर सशस्त्र क्रांतीवर विश्वास ठेवणारे सावरकर अखेर उपोषणाच्या मार्गाने गेले, तर आयुष्यभर उपोषण करणाऱ्या महात्मा गांधी यांचा मृत्यू गोळी लागून झाला, असे विधानही त्यांनी केले.

### भरकटलेली तरुणाई रस्त्यावर

डाव्या विचारसरणीच्या संघटनांवर टीका करताना पोंक्षे म्हणाले, इतिहासाची माहिती नसलेली आणि आंदोलनामागील कारणांची जाणीव नसलेली तरुणाई रस्त्यावर उतरत आहे. या तरुणांनी सावरकरांचे साहित्य वाचलेले नाही. केवळ आम्ही म्हणतो म्हणून राजीनामा द्या, अशी मागणी केली जाते. मात्र, संबंधित व्यक्तीने नेमका कोणता गुन्हा केला, हे सांगितले जात नाही. आरोप सिद्ध न करता राजीनाम्याची मागणी केली जाते, असा आरोप त्यांनी केला.

### सावरकरांच्या साहित्याची उपेक्षा झाल्याची भावना

सावरकरांच्या साहित्यिक योगदानाचा उल्लेख करताना पोंक्षे म्हणाले, सावरकरांनी सुमारे २० हजार पृष्ठांचे साहित्य लिहिले. रवींद्रनाथ टागोर यांना पुरस्कार मिळाल्यानंतर सावरकरांनी मोठ्या मनाने त्यांचे अभिनंदन केले. मात्र, त्याच तोडीचे साहित्य निर्माण करूनही क्रांतिकार्यात सहभागी झाल्यामुळे आपल्याला पुरस्कारांपासून वंचित ठेवण्यात आले, अशी भावना सावरकरांच्या मनात आली असण्याची शक्यता आहे, असेही त्यांनी नमूद केले.

# शेतकऱ्यांना पाच हजारांची मदत तोकडी - बच्चू कडू

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** शेतकऱ्यांना दिली जाणारी पाच हजार रुपयांची मदत तोकडी आहे. हा मदतीचा पहिला टप्पा असून, दिवाळीपर्यंत दहा ते पंधरा हजार



रुपयांपर्यंत अधिक मदत मिळावी, अशी अपेक्षा शिवसेना शिंदे गटाचे आमदार बच्चू कडू यांनी व्यक्त केली.

पक्षाच्या बैठकीसाठी ते नागपुरात आले असता प्रेस क्लबमध्ये पत्रकारांसोबत अनौपचारिक चर्चेदरम्यान बोलत होते. त्यांच्यासमवेत वित्त राज्यमंत्री आशीष जयस्वाल उपस्थित होते. कडू म्हणाले, श्रीमंत शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळू नये, ही भूमिका यापूर्वीच मांडली आहे. गरीब शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळावा, पात्र शेतकऱ्यांना योजनेतून वगळले जाऊ नये, असे त्यांनी सांगितले.

### विदर्भात शिवसेनेच्या विस्तारावर भर - जयस्वाल

यावेळी वित्त राज्यमंत्री जयस्वाल म्हणाले, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासारखे नेतृत्व पक्षाकडे आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेचा पूर्व विदर्भ आणि पश्चिम विदर्भात विस्तार करण्यावर विशेष भर दिला जात आहे. महाराष्ट्रातील इतर भागांप्रमाणे विदर्भातही पक्षाची ताकद वाढवण्याचे उद्दिष्ट आहे. उपमुख्यमंत्री शिंदे यांचे विदर्भाकडे सातत्याने लक्ष आहे. विदर्भाला विधान परिषदेचे चार आमदार मिळाले आहेत. विदर्भातील जनतेनेही शिंदे यांना प्रतिसाद द्यावा, अशी अपेक्षा जयस्वाल यांनी व्यक्त केली.



# निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्यासाठी ‘आप’चे आंदोलन

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** निवडणूक प्रक्रियेचा ढासळत चाललेला दर्जा, मतदार याद्यांमधील फेरफार आणि लोकशाही मूल्यांच्या गळचेपीविरोधात शहर आम आदमी पार्टीतर्फे गुरुवारी आंदोलन करण्यात आले. यावेळी केंद्रीय निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली.

संविधान चौकात आप कार्यकर्त्यांनी केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगाच्या हुकूमशाही कारभाराचा तीव्र निषेध नोंदवला. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांनी तत्काळ राजीनामा द्यावा, निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसंदर्भातील ‘२०२३ चा नवीन कायदा’ तत्काळ रद्द करावा. ज्ञानेशकुमार यांच्या कार्यकाळातील सर्व निवडणुका रद्द ठरवून त्यांची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी. निवडणूक प्रक्रिया मतपत्रिकेद्वारे घेण्यात यावी, एसआयआरपूर्वीची मूळ मतदार यादी जाहीर करण्यात यावी, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

आंदोलनात महाराष्ट्र संघटन सचिव भूषण ढाकुलकर, शहराध्यक्ष डॉ. अमेय नरनावरे, महिला अध्यक्ष पुष्पा डाबरे, युवा अध्यक्ष सुमित शेंडे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**नागपूर :** रात्रीच्या वेळी घराकडे निघालेल्या दुचाकीस्वाराला अंधारात अज्ञात वाहनाने धडक देत पळ काढल्यानंतर जखमी तरुणाचा वेळीच उपचार मिळाल्याने मृत्यू झाला. बेसा-पिपळा मार्गावर ही घटना घडली. दीपक श्रीकांत व्यवहारे (३७) असे मृताचे नाव आहे.

घोटाळ पांजरी येथील रहिवासी व्यवहारे हे रात्री घरी जात होते. त्यांना अज्ञात वाहनाने धडक देत पळ काढला. बेशुद्ध अवस्थेत व्यवहारे रस्त्यावर पडून होते. दरम्यान, सकाळी रस्त्यावरून जाणाऱ्यांना हा प्रकार लक्षात आला. त्यांनी पोलीस नियंत्रण कक्षाला याची माहिती दिली. पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता मेडीकल रुग्णालयात नेले असता, डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. हुडकेश्वर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली.

# कृषीपंप एकाच वेळी सुरू झाल्याने रोहित्रांवर ताण

## महावितरणकडून कृषीपंपाचे ऑटोस्विच काढण्याचे आवाहन

**नागपूर :** शेतांतील सर्व कृषीपंप एकाच वेळी सुरू झाल्याने रोहित्रांवर अतिरिक्त भार पडतो. त्यामुळे रोहित्र जळणे, वीजपुरवठा वारंवार खंडित होणे आणि मोटारी बंद पडण्याचे प्रकार घडतात. हे टाळण्यासाठी कृषीपंपांना योग्य क्षमतेचे कॅपेसिटर बसवावे आणि स्वयंचलित यंत्रणा काढून टाकावी, असे आवाहन महावितरणने केले आहे.

वीजपुरवठा सुरू होताच कृषीपंप आपोआप सुरू होण्यासाठी अनेक शेतकऱ्यांनी स्वयंचलित यंत्रणा बसवली आहे. त्यामुळे एकाच वेळी अनेक पंप सुरू होऊन वीज यंत्रणेवर अचानक भार येतो. कॅपेसिटरमुळे मोटारीला लागणारी अतिरिक्त प्रतिक्रियाशील वीज स्थानिक पातळीवर उपलब्ध होते. त्यामुळे वीज वाहिन्यांवरील भार कमी होण्यास आणि विद्युत यंत्रणेतील बिघाड टाळण्यास मदत होते, असे महावितरणने स्पष्ट केले.

कृषीपंपाच्या क्षमतेनुसार कॅपेसिटर बसवणे आवश्यक आहे. तीन अश्वशक्तीच्या पंपासाठी एक, पाच अश्वशक्तीच्या पंपांसाठी दोन आणि साडेसात अश्वशक्तीच्या पंपांसाठी तीन केव्हीएआर क्षमतेचा कॅपेसिटर वापरण्याची शिफारस करण्यात आली आहे. कॅपेसिटरची जोडणी योग्य पद्धतीने करणेही महत्त्वाचे आहे. त्यासाठी तज्ज्ञ विद्युत कर्मचाऱ्याची मदत घ्यावी. नागपूर परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी ९ ऑक्टोबरला घोगली गावातील शेतकरी राजू उकुंदराव राऊत यांच्या शेताला भेट देऊन कॅपेसिटरचे महत्त्व समजावून सांगितले. यावेळी त्यांना प्रातिनिधिक स्वरूपात कॅपेसिटर देण्यात आला. उपकार्यकारी अभियंता मंगेश कहाळे यांच्यासह महावितरणचे कर्मचारी उपस्थित होते.

# आणखी १४ रेल्वेगाड्यांना अजनीत तात्पुरता थांबा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपुरात येणाऱ्या प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने १९ आणि २० ऑक्टोबर रोजी १४ रेल्वेगाड्यांना अजनी स्थानकावर तात्पुरता थांबा देण्याचा निर्णय घेतला आहे. या गाड्यांना एक मिनिटाचा थांबा देण्यात येणार आहे.

सोमवारी (१९ ऑक्टोबर) चार रेल्वेगाड्यांना अजनी स्थानकावर एक मिनिटाचा थांबा देण्यात येईल. त्यात अहमदाबादझ्हावडा एक्स्प्रेस सायंकाळी ५.३१ वाजता, अमरावतीझ्जबलपूर एक्स्प्रेस सायंकाळी ७.३० वाजता, ब्रह्मपूरझ्अमृत भारत एक्स्प्रेस सायंकाळी ७.१३ वाजता, तर मडगावझ्नागपूर एक्स्प्रेस रात्री ८.०९ वाजता अजनी स्थानकावर पोहोचेल. या गाड्या एका मिनिटाच्या थांब्यानंतर रवाना होतील.



मंगळवारी (२० ऑक्टोबर) सहा गाड्यांना तात्पुरता थांबा देण्यात येणार आहे. यामध्ये मालदा टाउन एक्स्प्रेस, ज्ञानेश्वरी एक्स्प्रेस, आझाद हिंद एक्स्प्रेस, पुरी सुपरफास्ट एक्स्प्रेस, सीएसएमटीझ्हावडा मेल आणि विशाखापट्टणम एक्स्प्रेसचा समावेश आहे. या गाड्या रात्री १.३३ ते दुपारी १.२३ या वेळेत अजनी स्थानकावर पोहोचतील.

याच दिवशी आणखी चार गाड्यांनाही तात्पुरता थांबा मिळणार आहे. हावडाझ्सीएसएमटी मेल दुपारी २.१९ वाजता, आझाद हिंद एक्स्प्रेस सायंकाळी ४.१४ वाजता, अहमदाबाद एक्स्प्रेस सायंकाळी ७.१४ वाजता आणि उधना-अमृत भारत एक्स्प्रेस रात्री ८.१३ वाजता अजनी स्थानकावर पोहोचेल.

# अनिल चनाखेकर यांचे निधन

**नागपूर :** राजीवनगर येथील रहिवासी अनिल उपाख्य बापू चनाखेकर (७७) यांचे



हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मधून ते सेवानिवृत्त झाले होते. चनाखेकर हे नागपुरातील प्रख्यात रंगकर्मी, नाट्य संघटक होते. त्याचप्रमाणे गेली अनेक वर्षे धरमपेठ येथील राजाराम वाचनालयाचे सचिव म्हणून ते जबाबदारी सांभाळत होते. वाचन चळवळ समृद्ध करण्यासाठी त्यांनी अखेरपर्यंत प्रयत्न केले. याशिवाय नागपुरातील नाट्यप्रेमींना आणि कलावंताना त्यांनी राजाराम वाचनालयात हक्काची जागाही मिळवून दिली होती. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी सकाळी १० वाजता सहकारनगर घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येतील. त्यांच्या पश्चात दोन मुले आणि मोठा आप्तपरिवार आहे.

# हृदयाच्या झडपांवर उपचारासाठी चिरफाडविरहित पर्याय

## डॉ. कृष्णा संतोष वेमुरी यांची माहिती

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** हृदयाच्या झडपांमधील दोष किंवा रक्तवाहिन्यांमधील गंभीर अडथळ्यांवर उपचार करताना प्रत्येक वेळी मोठी शस्त्रक्रिया करावीच लागते, असे नाही. वैद्यकीय तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे काही रुग्णांवर शरीरात मोठी चिरफाड न करता कॅथेटरच्या साहाय्याने उपचार करणे शक्य झाले आहे. मात्र, या पद्धती सर्व रुग्णांसाठी योग्य नसून आजाराची तीव्रता आणि रुग्णाची प्रकृती तपासूनच त्यांची निवड केली जाते, अशी माहिती स्ट्रक्चरल अँड इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट, यशोदा हॉस्पिटल्स, हैदराबादचे डॉ. कृष्णा संतोष वेमुरी यांनी दिली.

गुरुवारी परिषदेत चेमुरी यांनी वरील माहिती दिली. हृदयाच्या महाधमनीची झडप आकुंचन पावल्यास किंवा मिट्रल झडपेतून रक्ताची गळती होत असल्यास ट्रान्सकॅथेटर पद्धतीने उपचार करता येऊ शकतात. महाधमनीची झडप बदलण्यासाठी ‘टीएव्हीआर’, तर काही प्रकारच्या झडपांमधील गळती कमी करण्यासाठी ‘टीईईआर’ ही उपचारपद्धती वापरली जाते. या उपचारांमुळे निवडक रुग्णांमध्ये मोठ्या शस्त्रक्रियेची गरज कमी होऊ शकते. रुग्णालयातील मुक्काम आणि बरे होण्याचा कालावधीही कमी होण्याची शक्यता असते. मात्र, उपचारांचे परिणाम रुग्णाच्या आरोग्यस्थितीवर आणि आजाराच्या स्वरूपावर अवलंबून असतात. त्यामुळे हृदयरोगतज्ज्ञांचा सल्ला आणि सखोल तपासणी महत्त्वाची ठरते, असेही डॉ. वेमुरी यांनी सांगितले.

# आंतरराष्ट्रीय प्राचार्य शैक्षणिक परिषद २२ ऑक्टोबरपासून

**नागपूर :** बदलत्या पिढ्यांच्या शैक्षणिक गरजा, नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती आणि भविष्यातील शिक्षणव्यवस्थेतील आव्हानांवर विचारमंथन करण्यासाठी द साऊथ पब्लिक स्कूल, ओंकारनगर यांच्या वतीने नववी आंतरराष्ट्रीय प्राचार्य शैक्षणिक परिषद (आयपीईसी-२६) २२ ते २४ ऑक्टोबरदरम्यान मिहान येथील भारतीय व्यवस्थापन संस्था (आयआयएम), नागपूर येथे होणार आहे.

‘अंडरस्टँडिंग वॉव (वर्ल्ड ऑफ वंडरफुल) जनरेशन्स झ् ब्रिजिंग इनसाइट्स अँड इनोव्हेशन्स’ ही या परिषदेची मुख्य संकल्पना आहे. देशातील विविध राज्यांतील नामांकित शाळांचे प्राचार्य आणि शिक्षणतज्ज्ञ परिषदेत सहभागी होणार असून, बदलत्या पिढ्यांचे आकलन आणि शिक्षणातील नव्या संकल्पनांची अंमलबजावणी यावर चर्चा होईल. परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी २२ ऑक्टोबर रोजी आयआयएम कोझिकोडचे संचालक प्रा. देबाशीष चॅटर्जी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील. पद्मश्री पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ कलाकार वासुदेव कामत विशेष अतिथी असतील. शिक्षणतज्ज्ञ डॉ. माला पलानी, भारतीय रंगभूमीवरील प्रसिद्ध व्यक्तिमत्त्व संजना कपूर आणि परिषदेच्या संयोजिका डॉ. मृणालिनी दस्तूरे यांच्यासह विविध मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी वासुदेव कामत, स्मरणशक्ती प्रशिक्षणतज्ज्ञ अदिती सिंघल तसेच आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांची व्याख्याने होणार आहेत.

# दुचाकीच्या बहाण्याने ८ जणांची फसवणूक

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**नागपूर :** सणासुदीच्या तोंडावर दुचाकी खरेदीवर आकर्षक योजना असल्याचे भासवून वाहन दुकान मालकाने ८ जणांना लाखो रुपयांचा गंडा घातल्याचा प्रकार गुरुवारी चव्हाट्यावर आला. शांतीनगर पोलीस हद्दीतील महाराष्ट्र मोटर्स मल्टीब्रांड वाहन दुकानात ही घटना घडली. तौफीक अशरफी (३५) असे आठ ग्राहकांना गंडा घालणाऱ्या भामट्या दुकान मालकाचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कावरापेठ येथील रहिवासी अब्दुल्लाह मोहम्मद आरीफ राईन (२६) यांना दुचाकी खरेदी करायची होती. यासाठी त्यांनी शांतनगर हद्दीतील दुकानाशी संपर्क साधला. तिथे स्वतः मालक तौफीक अशरफीने दुचाकीच्या किमतीच्या ५० टक्के रक्कम अनामत म्हणून भरल्यास, उर्वरित रक्कम १४ मासिक हप्ते भरण्याची विशेष योजना असल्याचे सांगितले.

तौफीक अशरफी याने २८ सप्टेंबर २०२४ ते २८ एप्रिल २०२५ दरम्यान, अशा आणखी ८ जणांकडून याचप्रमाणे ४ लाख ८९ हजार ७६६ रुपये घेतले. मात्र, तौफिकने त्यातील कमी रक्कम पतपुरवठा करणाऱ्या समुहाकडे जमा केली. त्याने उरलेली रक्कम बळकावली. तौफिकने ही रक्कम न भरल्याने ग्राहकांना पतपुरवठा करणाऱ्या समुहाला अतिरिक्त रक्कम भरावी लागल्याने आर्थिक भुर्दंड बसला. तौफिकने बनावट योजनेच्या नावाखाली ही फसवणूक केली. अब्दुल्लाह यांच्या तक्रारीवरून चौकशीअंती शांतनगर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

Bandhan Bank | प्रादेशिक कार्यालय : नेताजी मार्ग, मिठाखली सिक्स रोड्स जवळ, एलिसब्रिज, अहमदाबाद-6, दूरध्वनी: +91-26421671-75

**कर्जदारांना मागणी सूचना**

खाली नमूद खाते एनपीए मध्ये वर्गीकृत करण्यात आले असून सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट (अधिनियम), 2002 च्या कलम 13(2) अंतर्गत बंधन बँक लि. कडून खालील कर्जदारांना जारी करण्यात आलेली मागणी सूचना न बजावता परत आली आहे. त्यामुळे ही सूचना प्रकाशनाद्वारे तुम्ही सर्वांना आणि सर्वसामान्य जनतेला पाठविण्यात येत असून जाहीर करण्यात येत आहे.

| कर्जदार आणि हमीदारांचे नाव आणि कर्ज खाते क्र. | तारण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन (तारण मालमत्ता) | मागणी सूचनेची तारीख/ एनपीएची तारीख | मागणी सूचनेच्या तारखेस थकबाकी रक्कम | सूचना लावण्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| शंकर गंगाधर साखरकर, साधना शंकर साखरकर, दिपक तुकाराम तांबारे 20006180000753 | प्लॉट क्र. 16, क्षेत्रफळ- 154.83 चौ. मीटर, सर्वेक्षण क्र. 48/2, मौजा- मेहकर, तालुका- मेहकर, जिल्हा- बुलढाणा, महाराष्ट्र, 443301 आणि सीमा खालीलप्रमाणे-: उत्तर: नकाशाप्रमाणे, पूर्व: नकाशाप्रमाणे, पश्चिम: नकाशाप्रमाणे, दक्षिण: नकाशाप्रमाणे | 22 मे 2026 / 04 जुलै 2026 | रु. 6,97,561.71/- | 08 ऑक्टोबर 2026 |

या सूचनेद्वारे आपणास बँकेस देय असलेली रक्कम तसेच त्यावरील पुढील व्याज, खर्च आणि आकारणी यांसह, येथील दिनांकापासून 60 दिवसांच्या आत परतफेड करण्याची मागणी करण्यात येत आहे, अन्यथा बँक सरफेसी अधिनियमाच्या कलम 13(4) अंतर्गत पुढील कार्यवाही करण्यास बाध्य राहील.

कर्जदार/गहाणदार यांचे लक्ष अधिनियमाच्या कलम 13 च्या उपकलम (8) मधील तरतुदीकडे वेधण्यात येत आहे, ज्यामध्ये उपलब्ध कालावधीमध्ये तारण मालमत्ता मुक्त करण्याबाबत तरतूद आहे.

ठिकाण : महाराष्ट्र | दिनांक : 16 ऑक्टोबर 2026

सही/- प्राधिकृत अधिकारी बंधन बँक लिमिटेड

**पिक्स ट्रान्समिशन्स लिमिटेड**

CIN-L25192MH1981PLC024837

पंजीकृत कार्यालय: जे-7, एम.आय.डी.सी., हिंगणा रोड, नागपूर - 440 016, महाराष्ट्र, भारत

फोन: 07104-669000 ▪ ईमेल: info@pixtrans.com ▪ वेबसाईट: www.pixtrans.com

PIX Power Transmission Solutions Driving growth!

**सार्वजनिक सूचना**

**ज्यांना हे संबंधित असेल त्यांच्यासाठी**

याद्वारे असून सर्व संबंधितांना सूचित करण्यात येते की, कंपनीच्या खाली नमूद केलेल्या प्रत्येकी रु. 10/- दर्शनी मूल्य असलेल्या समभागांचे प्रमाणपत्र/प्रमाणपत्रे हरवले/गहाळ झाले असून, संबंधित धारक/अर्जदार यांनी कंपनीकडे त्याबाबत डुप्लिकेट समभाग प्रमाणपत्रे जारी करण्यासाठी अर्ज केला आहे.

समभागधारणेचा तपशील खालीलप्रमाणे आहे:

| भागधारकाचे नाव | फोलिओ क्रमांक | प्रमाणपत्र क्रमांक | प्रारंभिक विशिष्ट क्रमांक | अंतिम विशिष्ट क्रमांक | समभागांची संख्या | दावेदार (असल्यास) |
|---|---|---|---|---|---|---|
| RAJARAM KATARUKA | R002432 | 19346 | 1934501 | 1934600 | 100 | RAJARAM KATARUKA |
| RAJARAM KATARUKA | R002432 | 35084 | 2187101 | 2187200 | 100 | RAJARAM KATARUKA |
| RAJARAM KATARUKA | R002432 | 51333 | 3683201 | 3683300 | 100 | RAJARAM KATARUKA |
| RAJARAM KATARUKA | R002432 | 51879 | 3737801 | 3737900 | 100 | RAJARAM KATARUKA |
| RAJARAM KATARUKA | R002432 | 51985 | 3748401 | 3748500 | 100 | RAJARAM KATARUKA |
| RAJARAM KATARUKA | R002432 | 53806 | 3930501 | 3930600 | 100 | RAJARAM KATARUKA |
| RAJARAM KATARUKA | R002432 | 63865 | 4936401 | 4936500 | 100 | RAJARAM KATARUKA |
| RAJARAM KATARUKA | R002432 | 63866 | 4936501 | 4936600 | 100 | RAJARAM KATARUKA |

सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, वरील नमूद समभाग प्रमाणपत्रांच्या खरेदी–विक्री अथवा अन्य कोणत्याही प्रकारच्या व्यवहारापासून सावध राहावे. सदर समभाग प्रमाणपत्रांबाबत कोणत्याही व्यक्तीचा कोणताही दावा असल्यास, त्यांनी या जाहिरातीच्या प्रसिद्धीपासून **15 दिवसांच्या आत** आपला दावा कंपनीकडे किंवा तिच्या रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजंट **MUFG Intime India Private Limited**, 247 Park, C-101, पहिला मजला, एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई - 400083, दूरध्वनी: 8108116767 यांच्याकडे लेखी स्वरुपात सादर करावा. निर्धारित कालावधीत कोणताही दावा प्राप्त न झाल्यास, कंपनी डुप्लिकेट समभाग प्रमाणपत्रे जारी करण्याची पुढील कार्यवाही करेल आणि त्यानंतर कोणताही दावा ग्राह्य धरला जाणार नाही.

पिक्स ट्रान्समिशन्स लिमिटेड साठी

स्वाक्षरी/-

शिबू व्हर्गिस

कंपनी सचिव

स्थळ: नागपूर

दिनांक: 16.10.2026

SBI भारतीय स्टेट बँक State Bank of India

गृह ऋण केन्द्र-II, नागपूर, प्रशासकीय कार्यालय, तिसरा माळा, सरदार वल्लभभाई पटेल मार्ग, नागपूर - 440001. Email: sbi.64219@sbi.co.in, Tel.: 0712-6137474

**ई-लिलाव सूचना**

भारतीय स्टेट बँक, गृह ऋण केन्द्र-II, नागपूर खालील वाहनांची विक्री करिता "जसे आहे जेथे आहे" आणि उपलब्ध आहे ते डाकुमेंट या आधारावर ई-लिलाव करीत आहोत.

| अनु. क्र. | कर्जदार आणि जमानतदारचे नाव | वाहनाचे विवरण | ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ | राखिव किंमत | ईएमडी किंमत |
|---|---|---|---|---|---|
| 1. | स्व. श्रीमती राजेश्री सुनील गजभिये | कार : मारुती सुझुकी फ्रॉन्क्स सिग्मा<br>मेक : मारुती सुझुकी इंडिया लि.<br>नोंदणी क्रमांक : MH 49 BW 9161<br>उत्पादन वर्ष : 2023<br>रंग : पर्ल आर्क्टिक- व्हाईट<br>चेसिस क्रमांक : MBHKWD13SPF126164<br>इंजिन क्रमांक : 4286104<br>इंधनाचा प्रकार : पेट्रोल | 31/10/2026 सकाळी 11:00 ते सायंकाळी 5:00 | रु. 3,75,000/- | बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) रु. 37,500/- |
| 2. | कैलाश हसनंद कल्याणी | कार : स्कोडा स्लाव्हिया 105 टीएसआय एटी<br>मेक : स्कोडा ऑटो फोक्सवॅगन इंडिया प्रा. लि.<br>नोंदणी क्रमांक : MH 31 GA 3263<br>उत्पादन वर्ष : 2025<br>रंग : लावा ब्लूचेसिस<br>क्रमांक : MEXBRAPB2SG010252<br>इंजिन क्रमांक : DUM A80080<br>इंधनाचा प्रकार : पेट्रोल | | रु. 7,75,000/- | बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) रु. 77,500/- |

वरिल वाहनांचा **ई-लिलाव दिनांक 31/10/2026 रोजी सकाळी 11:00 ते दुपारी 05:00 वाजे दरम्यान** ऑनलाइन पध्दतीने https://baanknet.com या वेबसाईटवर करण्याचे ठरविले आहे. इच्छुक व्यक्तीने वरील वाहनांचा निरीक्षणाकरिता **(1) श्री. डी. एस. वानखेडे - मो.: 7499094350 (2) श्री. अमर नखले - मो.: 9767446453 यांना दिनांक 29/10/2026 ते 30/10/2026 रोजी वेळ सकाळी 10:00 ते सायं 05:00 वाजे** दरम्यान संपर्क साधावा. अधिक माहिती करीता **भारतीय स्टेट बँक शाखा गृह ऋण केन्द्र-II, नागपूर** येथे **श्रीमती अनुभूती त्रिपाठी** यांच्याशी संपर्क साधावा.

लिलावाच्या अटी व शर्ती :

1) "जसे आहे जेथे आहे" आणि "उपलब्ध आहे ते डाकुमेंट" या तत्वावर विक्रीस काढलेले आहे.
2) कोणत्याही कारणाशिवाय एखादी निविदा किंवा सर्व निविदा नामंजुर करण्याचा सर्वस्वी अधिकार बँकेचे प्राधिकृत अधिकारी यांना राहील.
3) सदर वाहन आपल्या नावे करण्याची संपुर्ण जबाबदारी खरीदार व्यक्तीशी राहील.
4) सदर वाहनावर कुढल्याही प्रकारचा न्यायालयीन गुन्हा नसल्याची खात्री करुन घ्यावी.
5) ई-लिलाव बोलीची किमत 5,000/- रुपयाने वाढवीत नेली जाईल.
5) यशस्वी खरेदीदार कायदयानुसार, विक्री किमतीच्या 18% GST पर्यंत भरण्यास जबावदार राहील.
7) लिलावात सहभागी होणाऱ्या अंतिम खरीदाराला ईएमडी रक्कम वगळता, विक्री किमतीच्या 25% रक्कम त्याच दिवशी किंवा दुसऱ्यादिवशी भरावी लागेल आणि उर्वरित रक्कम लिलावाच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत भरावी लागेल. न भरल्यास, 10% ई. एम. डी म्हणून जमा केलेली आणि 25% आगाऊ जमा केलेली रक्कम जप्त केली जाईल.

दिनांक : 16-10-2026

स्थळ: नागपूर

(इंग्रजीतील मुळ मजकूर ग्राहय धरण्यात येईल)

स्वा./-

(अधिकृत अधिकारी)

भारतीय स्टेट बँक, गृह ऋण केन्द्र-II, नागपूर.